जात वर्ग स्त्रीदास्यांतासाठी...

# सत्यशोधक संघर्ष

(इ-अंक १ला)

सप्टेंबर 2015

कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्र

**या अंकात...**

१. संपादकीय

२. कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्राची भूमिका

३. विशेष लेख: समाजक्रांतीची मशाल धगधगती ठेवण्यासाठी...
- जगदीप मोरे

४. शाहिरी: जोतिबाची लेकरं... - एकनाथ ढोकळे

## संपादकीय...

# **कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्र**

## **भूमिका**

युरोपीय समाजात प्रबोधन क्रांती झाली, त्यानंतर धर्म सुधारणा चळवळ आणि पुढे औद्योगिक क्रांती यांचे अवरुध्द मार्ग मोकळे झाले. भारतीय समाज परंपरेने जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्या उत्पादनसंबंधावर आधारलेला राहिला आहे. ब्रिटीश वासाहतिक काळात भारतीय समाजात शोषण - शासनाची व्यवस्था म्हणून वर्गव्यवस्था कार्यरत झाली. बनिया भांडवलदार जातवर्ग, वरचढ शेतकरी जातींचे अभिजन आणि बौद्धिक उत्पादन साधनांवर मालकी असलेला ब्राह्मणी बुद्धीजीवी जातवर्ग यांनी प्रबोधन चळवळ उभारण्यास नकार दिला. भारतात प्रबोधन क्रांतीची चळवळ उभारली जाणे ही राजकीय आणि सांस्कृतिक क्रांतीची पुर्वअट आहे. हे लक्षात घेऊन त्यासाठी कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्र भारतीय नवप्रबोधनाचे वाहक बनण्याची प्रतिज्ञा करीत आहे. समाज, संस्कृती, इतिहास, धर्म, साहित्य, विचारप्रणाली, कला इत्यादी क्षेत्रातील प्रबोधन-अवरुध्दतेविरोधात संघर्षाचा एल्गार करीत आहे, या सर्व क्षेत्रात ब्राह्मणी वर्चस्ववादी शक्तींनी आपले अधिनेतृत्व प्रस्थापित केले आहे, त्याविरोधात अविरत संघर्षाचे आवाहन करीत आहे. इतिहासाच्या क्षेत्रातील ज्ञानाचे शक्तिशाली ब्राह्मणीकरण करून शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांवर सांस्कृतिक दहशतवाद लादणारी महासंरचनाच उभी करण्यात आलेली आहे. या महासंरचनेची अब्राह्मणीकरण प्रक्रियेच्या जोरावरच विरचना करावी लागेल. अब्राह्मणी अन्वेषण व पध्दतीच्या सम्यक अवलंबनाद्वारे मुक्तिदायी ज्ञानाची नवरचना उभी करावी लागेल. सत्यशोधक प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांनी मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाची प्रस्थापना करुन इतिहास आणि संस्कृती याबरोबरच धर्म, साहित्य, अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र, समाज, तत्वज्ञान, अर्थराजकारण या सर्वच क्षेत्रातील ज्ञानाच्या पुनर्रचनेच्या महाप्रयासास प्रारंभ केला.

कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्र या महाप्रयासातील सक्रीय वाहक म्हणून भूमिका अदा करण्याचा संकल्प घोषित करीत आहे.कॉ.

शरद पाटील यांनी मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाची अन्वेषण पध्दती स्वीकारुन ज्ञानाच्या विविध शाखांमध्ये समाजपरिवर्तक भूकंप उभे केले. नवप्रबोधकांच्या हाती ज्ञानाच्या पुनर्रचनेची हत्यारे दिली, भारतीय नवप्रबोधनाचे शस्त्रागार उभे केले. मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद आणि त्यानंतर सौत्रांतिक मार्क्सवाद यांच्या आधारे समाजपरिवर्तक ज्ञानाच्या महा-इतिहासाला २१व्या शतकातील महाद्वाराशी आणून नव्या तत्वज्ञानाचा शोध अपरिहार्य केला. कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्र 'माफुआ'ने प्रदान केलेल्या योगदानाचा स्वीकार करते आणि सौत्रांतिक विज्ञानातून येणाऱ्या विधायक उपलब्धींचे स्वागत करते.

साहित्याच्या क्षेत्रात माफुआची अन्वेषण पध्दती भारतीय साहित्याचा ब्राह्मणी इतिहास आणि ब्राह्मणी सौंदर्यशास्त्र यांच्या पायाभूत रचनांना उखडून फेकून देते. भारतीय साहित्याच्या उदयविकासामागील वर्ण, जात व वर्ग या शक्तींचे योगदान अधोरेखित करते. साहित्य-समीक्षा व साहित्य चळवळी यांच्या अवरुध्दतेचा प्रश्न सोडवणूकीसाठी तत्वज्ञानाच्या उंबरठ्यावर आणून सोडते. माफुआ आणि त्यावर आधारीत राजकारणामुळे भांडवली राज्यशास्त्राच्या मर्यादा उघड केल्या जातात. जातीव्यवस्था अंताचा प्रश्न भारतीय राजकीय विचारधारेच्या केंद्रस्थानी आणण्याचे २१व्या शतकातील महत्वपूर्ण कार्य मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद बजावतो. भारतीय राजकीय व्यवस्था, राष्ट्रवाद, शासनसंस्था आणि भारतीय लोकशाही क्रांती यांच्या संदर्भातील अब्राह्मणीकरणाची व म्हणून संशोधनाची मागणी हे केंद्र करते, नव्या राज्यशास्त्राच्या मागणीचा पुनरुच्चार करते. भारतीय राज्यशास्त्राच्या मांडणीवर पाश्चात्य उदारमतवाद आणि पारंपारिक ब्राह्मणवाद यांचा पगडा आहे. सामाजिक संरचना, परिवर्तन, सामाजिक नियंत्रण, धर्म, कुटुंबसंस्था याविषयक सिध्दांतावर ब्राह्मणवादाचा पगडा आहे. हे संशोधन केंद्र त्यासंदर्भातील वास्तवज्ञानासाठी संशोधनाची मागणी करते. भारतीय इतिहास लेखणावर देशी ब्राह्मणवादाचा पगडा असल्यामुळे ते शूद्रातिशूद्र व स्त्रिया यांच्या मुक्तीस पोषक ज्ञान साधने देवू शकत नाही. स्थानिक इतिहास ते सबाल्टर्न स्टडीज् आणि मौखिक इतिहास यातील संशोधनाद्वारे

भूतकालीन समाजातील खऱ्या इतिहास नायकांना व नायिकांना न्याय देणे शक्य होणार आहे.

भारतीय समाज जातीव्यवस्थेबरोबरच भांडवलशाही आणि साम्राज्यवाद यांच्या आर्थिक आधारांनी ग्रस्त झालेला आहे. एकांगी जातलक्षी ब्राह्मणजातविरोध सीमित विश्लेषण पध्दती नवी वित्तभांडवलशाही आणि उत्तर आधुनिक औद्योगिक व्यवस्था यांच्या परिणामांना उजागर करु शकत नाही. याची दखल न घेतल्यामुळे दलित चळवळीतील काही प्रवाहांना खाजगीकरण आणि साम्राज्यवाद यांच्या शक्तीस्त्रोतांवर हल्ला करण्यापासून प्रदीर्घ काळ दूर रहावे लागले. संशोधन केंद्र या संदर्भातील प्रश्नांचा शोध घेऊन राजकीय अर्थशास्त्राचे अद्यावतीकरण करण्याची भूमिका घेत आहे.

पारंपारिक राज्यशास्त्रावर उच्चजातकेंद्री राष्ट्रवाद आणि पाश्चात्य उदारमतवाद यांचा पगडा असल्याने जमातवाद, राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता व लोकशाही आदी संकल्पना ब्राह्मणीकरणाला बळी पडलेल्या आहेत. भारतीय फ्यासिझमचे बाह्यांग परधर्मद्वेषाचे जरी असले तरी त्याचा आंतरिक शक्तीस्त्रोत जाती-पितृसत्ता आहे. हे केंद्र म्हणूनच अब्राह्मणी धर्मनिरपेक्षता अब्राह्मणी राष्ट्रवाद यांच्या पुनर्मांडणीसाठी सक्रीय राहील.

उदारमतवादी स्त्रीवादाचे अभ्यासक्षेत्र स्त्रियांचे मानवी अधिकार आणि स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचार यापुरते मर्यादित होते. 'माफुआ'ने या अभ्यासक्षेत्राचा विकास घडवून आणला आणि भारतीय स्त्रीदास्याचा प्रश्न वर्णजातीव्यवस्थेच्या उदयाशी जोडला. स्त्रीयांचे शोषण, दमन आणि त्यांचे राजकीय चळवळीतील स्थान यासंदर्भातील नवे सिध्दांत माफुआं पुढे आणतो. त्यांचा अभ्यास हा क्षेत्रिय पाहण्या याधारे होणे अत्यावश्यक आहे.

## उद्दिष्टे आणि कार्यकक्षा:

१. जातीव्यवस्था अंताच्या प्रबोधनास हे केंद्र प्रोत्साहन देईल. स्त्रीदास्याचा उदय, विकास आणि अंत यासंदर्भातील विचार-जागृतीसाठी

अभ्यासवर्ग, चर्चासत्र, परिषदा आणि संमेलने यांचे आयोजन करण्यात येईल.

२. जातीव्यवस्थेच्या अर्थशास्त्राची उभारणी करणे जातीअंताच्या वास्तववादी कार्यक्रमपत्रिकेसाठी आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र संशोधनाच्या आघाडीवर क्रियाशील असेल.

३. माफुआ तत्वज्ञानाच्या अनुषंगाने स्त्रीवादाची, स्त्री पुरुष समतेवर पर्यायी मानव समाज निर्मितीच्या दृष्टीने नव्या स्वरूपात मांडणी करणे.

४. जागतिकीकरणातून  उद्भवलेले प्रश्न, समाजस्थिती तसेच नव्या समाजवादाची गरज यांची मांडणी करणे.

५. साहित्याच्या क्षेत्रातील तळागाळातील जातीजमातींच्या मौखिक परंपरेतील वांड.मयसंबंधित संमेलने आयोजित करण्यात येतील. भिलोरी, पावरी, आदी आदिवासी भाषांचे संशोधन व संमेलने यांचे आयोजन करण्यात येईल.

६. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा वास्तवदर्शी शोध घेण्याआसाठी संस्कृत, पाली आदी भाषांचा अभ्यास करण्यात येईल. त्यासंदर्भातील ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन व संरक्षण करण्यासाठी केंद्र प्रयत्नशील असेल.

७. जात-जमातीय तणाव आणि दंगली यांच्या प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहण्यांसाठी पथक कार्यरत राहील. भांडवली मिडीया आणि जात-जमातीय सत्ताधारी यांच्या युतीमुळे वास्तव ज्ञानाच्या अभिव्यक्तीवर अनेक बंधने येत आहेत, या पार्श्वभूमीवर ‘सत्यशोधन पथक’ हे महत्वाची भूमिका बजावेल.

८. भारतीय नवप्रबोधनाच्या व्यापक चळवळीचा एक भाग म्हणून हे केंद्र अशा चळवळींच्या संवर्धनासाठी सक्रीय राहील. ‘डाव्या दलित-दलितेतर संघटनांकडे’ साहित्य, संस्कृती, धर्म, कला, समाज, विचारप्रणाली, इतिहास

या क्षेत्रात अब्राह्मणी प्रबोधनाची कार्यक्रमपत्रिका नाही. या वास्तवाचा पुकारा करण्यासाठी केंद्र संघर्ष देईल.

९. हे केंद्र लोकशाही आणि शांततामय मार्गाने होणाऱ्या प्रबोधन उपक्रमांचा स्वीकार करेल. कलापथक, व्याख्यानमाला, चर्चासत्रे, संमेलने, इत्यादि माध्यमांचा अवलंब करेल. केंद्र विचारप्रसारासाठी मुखपत्राचेही प्रकाशन करु शकेल. केंद्राद्वारे प्रबोधन-पुस्तिकांचे नियतकालिक प्रकाशनही करण्यात येईल. १०. समविचारी संस्था, संघटना यांच्यासोबत सहकार्याची/ समन्वयाची भूमिका केंद्राची असेल.

## समाजक्रांतीची मशाल धगधगती ठेवण्यासाठी कॉ. शरद पाटलांची मांडणी विधायक पद्धतीने समजून घ्यावी लागेल..!

मारियाना असे .............म्हणतात, सर्वोकृष्ट माणसं दोषामधून बनलेली असतात. आणि ती थोडी वाईट असल्यामुळे बव्हंशी बरीच चांगली असतातात.

'मेअर ऑफ फ्रेजर' - विल्यम शेक्सपिअर

कॉ. शरद पाटील याचं एप्रिल १४ मध्ये निधन झाल्यानंतर त्यांच्या विचारांवर धुमश्चक्री महाराष्ट्रात चालू झाली आहे. काही मंडळी त्यांच्या विचारांची नकारात्मक पद्धतीने मांडणी करतात. तर काही तटस्थपणे व सावधपणे विचार मांडतात. मात्र अद्यापही कम्युनिस्ट व आंबेडकरवादी त्यांच्या काही भूमिकेशी सहमत आहेत असं दिसत नाही. त्यांनी जो ज्ञानाचा डोंगर उभा केलाय त्याचा वापर येत्या काळात निश्चितच होणार.

रशिया चीनने भांडवली मार्ग पत्करला. तेव्हा पुनश्च मार्क्सवादी व भारतातील विचारवंतांना प्रश्न पडला की, भांडवलशाहीला काही पर्याय आहे की नाही? की, केवळ भांडवलशाहीला विरोध करत बसावं, पण पर्यायी व्यवस्थेचा मार्ग काय असावयास हवा यावर गंभीरपणे जगात चर्चा होत नाही. भारतात ब्राह्मणी व्यवस्थेने रचलेला ज्ञानाचा पहाड पोखरण्यासाठी ज्या साधनांची (tools ची) गरज लागते ते पुरवण्याचं काम शरद पाटलांची मेथडॉलॉजी निश्चितच करणार. कॉ. शरद पाटलांनी वापरलेली भाषा, त्यांचे सिद्धांत, तत्वज्ञान यांच्यावर केवळ टिकेच्या उद्देशाने लिहिलं जातय. ही बाब योग्य नाही. त्यांच्या एकूण वैचारिक मांडणीत असलेला विरोधाभास, एकांगीपणा ह्या बाबींची चर्चा विधायक पद्धतीने होण्यापेक्षा तसेच विचारांचा विकास होण्याऐवजी विचारांची गच्छंती होते की काय? अशी मनात शंका निर्माण होते. हे सर्व थांबिविण्यासाठी त्यांच्या विचारांवर विधायकपने तितकेच निर्भयपणे टीका टिपणी विना पूर्वग्रहदुषित व्हावयास हवी आणि ती एकूण क्रांतिकारी चळवळीच्या दृष्टीने हितावह असेल.

अन्यथा ब्राह्मणी व भांडवलदारी व्यवस्थेला खिंडार पडण्याचं काम अर्धवट सोडून दिल्यासारखे असेल. शिवाय या दोन्ही व्यवस्थेला कळत नकळत बळकटी देण्याच काम होऊन जाईल हे लक्षात घ्यावयास हवं.

जगातील समाजवादी विचारांचा संकोच होत असतानाच कॉ. शरद पाटलांचा चौथा खंड 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता-स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद' प्रकाशित झाला. हा खंड समाजवादी पूर्तीच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरविण्यासाठी व्यापक चर्चा होण्याऐवजी काही मोजक्याच भारतीय अभ्यासकांनी ह्या त्यांच्या कृतीकडे गंभीरपणे पाहिले. कॉ. मधु शेटये यांनी स्पष्ट केलय की, माहिती तंत्रज्ञानामुळे भांडवलशाही आणि समाजवादी पर्याय कुंठीत झालेले आहेत. अशा अरिष्ट परिस्थितीत भारतातील समाजवादी लोकशाही क्रांतीचा मार्ग काय असावा यावर ठाम मार्गदर्शक ठरणारी ऐतिहासिक अशी दार्शनिक कामगिरी कॉ. शरद पाटील यांनी केलेली आहे. (१)

जगाला आर्थिक अरिष्टाने ग्रासलेले असताना कॉ. शरद पाटील हे पुस्तक समाजवादाच्या शोधात असणारया चीन, व्हिएतनाम, क्युबा आणि उत्तर कोरीया लोकांना अर्पण करतात. हे देखील क्रांतीच्या दृष्टीने प्रेरणादायक आहे.

क्रांतिकारी थेअरी शिवाय क्रांती होत नाही. असं लेलीनने म्हटलं आहे. चीन. व्हिएतनाम , उत्तर कोरिया आणि क्युबा या देशांना त्यांच्या भांडवलदारी लोकशाही क्रांत्या करायला लेलीनच हे मत उपयुक्त ठरते. कारण त्यांचे समाज वर्ग समाज होते. त्यांच्या क्रांत्या यशस्वी झाल्या. याचे कारण त्या स्वलक्षण(unique) पद्धतीने केल्या गेल्या, रशियन पद्धतीने नाही.

मॉर्गनचा काल्पनिक प्रीमिटीव्ह कम्युनिझम स्वीकारल्यामुळे युरोपीय समाजवाद कोसळला आणि ही राष्ट्रे समाजवाद उभारू न शकल्याने भांडवलशाही चोखाळत आहेत. भावी समाजवादाची उभारणी मातृसत्ता स्त्रीसत्तेची तुलना केल्याशिवाय आणि समाजवादी लोकशाहीची घडण स्त्रीसत्ता व भांडवलशाही

यांच्या लोकशाहीशी तुलना केल्याशिवाय करता येणार नाही. शिवाय जाणीव नेणीव अन्वेशी तर्कशास्त्राची जाणीव दृष्टी हाती घेतल्याशिवाय करता येणार नाही. पण ह्या देशांना समाजवादाच्या निर्मितीच गणित लक्षात येत नाही. म्हणून नव्या तत्वज्ञानाची त्यांना गरज आहे असं शरद पाटील सूचित करतात.

भारताच्या बाबतीत मात्र कॉ. शरद पाटील प्रतिपादतात की, भारतीय समाज मूलतः जाती समाज आहे. म्हणून त्याची भांडवलदारी लोकशाही क्रांती नव्या थेअरीने नाही, नव्या तत्वज्ञानानेच होऊ शकते.(२)

## संयोग मार्क्स फुले आंबेडकरांचा

**मा. फु. आ.**(१९९३) मध्ये त्यांनी मांडला. त्यापूर्वी ते सातत्याने सत्यशोधक मार्क्सवादी मासिकात ह्या त्र्यायींच्या संयोगाचा विचार मांडीत आलेले होते. वास्तविक ह्या तिन्ही विचारधारेचा त्यांचा प्रयोग हा प्रा.वडस्करांनंतरचा जरी असला तरी त्याला भारतातील लोकशाही क्रांतीची नव्या स्वरूपातील मांडणी व कार्यक्रम देण्याच काम ह्या संयोगाने दिले. हे नाकारू शकणार नाही. एखद्या विषयाची मांडणी करणे व त्याला फंक्शनल करण्यासाठी मांडणे. ह्यात मुलभूत फरक असतो. विचार जनसामान्यांची पकड तो फंक्शनल असल्याशिवाय घेऊ शकत नाही. मा. फु. आ. तत्वतः फंक्शनल वाटत राहिला.

प्रा. नलिनी पंडितांनी 'जातिवाद व वर्गवाद'(१९६४) या पुस्तकाद्वारे महाराष्ट्राच्या वैचारिक वर्तुळात वर्ग व जाती लढे एकत्र लढले पाहिजेत, ह्या अंगाने चर्चा केली. मात्र ह्या भूमिकेत वर्ग व जाती प्रश्नांना द्विखंडित समजून मांडले गेल्याचे स्पष्ट होत नाही. परिणामी दलित शक्तींना जोडण्यासाठी हा मुद्दा पुढे न येता दलितांना वर्गांकित करण्यासाठीचा तो भाग होता असच समजल गेलं. त्यामुळे त्याची तात्विक बैठक पुढे सरकली नाही. मात्र कॉ. रावसाहेब कसबे यांनी मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाच्या समन्वयाची भूमिका मांडली. त्याचं स्वागत ना कर्मठ मार्क्सवाद्यानी केलं ना कर्मठ आंबेडकरवाद्यांनी केलं. वर्गच

सत्य आहे. जाती मिथ्या आहे. वर्गातून शोषण होते, जातीतून जुलूम होतो. ह्या मार्क्सवादी वैचारिक पकडीतून सुटका मार्क्सवादी करू शकले नाहीत. तर जात हीच शोषणाची एकमेव पद्धत भारतात आहे. मार्क्सवाद भारताला गैरलागू आहे. ह्या धारणेतून आपली सुटका कर्मठ आंबेडकरवादी करू शकले नाहीत. तथापि मा. फु. आ. च्या मांडणीतून नव्या तात्विक बाबींची चर्चा भारताच्या वैचारिक विश्वात सुरु झाली. कम्युनिस्ट आणि आंबेडकरवादी यांच्या आजच्या अरिष्टांवर उपाय म्हणून कॉ. शरद पाटील एक उदाहरण देतात. मृत्यू देवतेने दोन निर्जीव अर्भकांना (ज्यांना दासींनी उकिरड्यावर फेकलेले होते.) त्यांना उचलून एकमेकांना जोडले व जरासंध जिवंत झाला. कम्युनिस्ट व दलित चळवळ या अर्भकांच्या जोडनितूनच जिवंत आणि प्रभावी क्रांतिकारी चळवळ उभी राहू शकेल.

भारतीय इतिहासाचं भौतिकवादी आकलन बहुप्रवाही पद्धतीने करून त्यांनी भारतीय ऐतिहासिक भौतिकवादाची स्वतंत्र व्याख्या केली. हे त्याचं बहुमूल्य योगदान आहे. त्याने भारतीय समाजातील संघर्ष कालक्रमानुसार कसा बदलत गेला हे स्पष्ट झालय. “शोषणशासनाधारित समाजाच्या उदयापासून वसाहतीक समाजाच्या उदयापर्यंतचा भारतीय इतिहास शोषक शासक वर्ग वा जाती वा जमाती (तुर्कांसारख्याच्या अर्थी ) आणि शोषितशासित जमाती (आदिवासिंसारख्यांच्या अर्थी) यांच्यातील लढ्यांचा होता. तर वसाहतीक काळापासून भारतीय इतिहास वर्ग जाती जमातींच्या लढ्यांचा आहे.” असे त्यांनी मांडले. त्यालाच आपण मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद असं म्हणतो. (३) या व्याख्येद्वारे शरद पाटील भारतीय ऐतिहासिक भौतिकवादाची स्थिती मांडतात.

मात्र नंतर कॉम्रेडांनी मा.फु. आ. ची तात्विक भूमिका सोडून सौत्रांतिक मार्क्सवादाची भूमिका घेतली. मार्क्सवादी वर्गवादाने जात्यंत अशक्य आहे. हे जाणल्यानंतर फुले आंबेडकरवाद स्वीकारला. पण फुले आंबेडकरवाद हे तत्वज्ञान नसून विचारसरणी असल्याने व पुढे जात्यंतक दृष्टी उद्दिष्टाकडे जायची दृष्टी व

शक्ती देऊ शकत नाही, हे समजल्यानंतर दिग्नागवादाने पुढे गेलो. असं कॉम्रेड सांगतात. (४) नवा माणूस घडविण्यासाठी नव्या तत्वज्ञानाची गरज आहे. असे मांडून सौत्रांतिक मार्क्सवादाची मांडणी केली. फुले आंबेडकरांनी ब्राह्मणी विचारधारेची केलेली विरचना डावलून नव्या माणसाची घडण कशी होऊ शकेल? भारतीय समाज व्यवस्थेतील महत्वाच्या बाबींची म्हणजे ब्राह्मणी 'धर्म संस्कृती व आर्थिक रचना याचं डीकंट्रक्शन फुले आंबेडकर विचारांनी केलेल आहे. परंतु तरीही ब्राह्मणी पितृसत्ता, जातीसंस्था, जात वर्ग प्रक्रियेची उपयुक्तता अशा सैद्धान्तिक व्युहाबद्दल शरद पाटलांनी मत व्यक्त केलेलं दिसत नाही. फुले आंबेडकरांनी आग्रही मानलेल्या व्यक्तीस्वातंत्र्याचा विचार आजही मुलभूत व तितकाच गरजेचा आहे. कारण सर्व शोषणाविरुद्ध व्यक्तीला त्याच्या जात धर्मापलीकडे जायला प्रेरणा देतो. ही आधुनिक काळातील प्रेरणा सौत्रांतिकवाद देऊ शकेल ह्याबद्दल निश्चित खात्री देऊ शकत नाही. त्यामुळे कदाचित प्रा. गोखले म्हणतात, शरद पाटलांनी सौत्रांतिकवाद वादाचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे जपलेला फुले आंबेडकरवाद सोडण्याची गरज नाही. तर मा. फु आ. लाच 'सौत्रांतिक मार्क्सवादाचे' नवे परिणाम आपण देत आहोत. अशी भूमिका त्यांनी घेतली तर त्यांच्या पासून दुरावत चाललेल्या कित्तेक आंबेडकरवाद्यांचे पाठबळ त्यांना लाभेल. (५)

परंतु शरद पाटील स्वतःच मांडतात की, तत्वज्ञानाचे प्रश्न तत्वज्ञानीच्या डोक्यात निर्माण होत नसतात. तर ते अगोदर व्यवहारात पडत असतात. मा. फु. आ. चा व्यावहारिक प्रश्न काय पडला होता याची मात्र चर्चा कोम्रेडांनी केलेली दिसत नाही, असं एकंदरीत दिसतं. बुद्धाची प्रमाण समता ही प्रयोगातूनच व आजच्या काळातील व्यावहारिकता जपणारी आहे. बुद्धाने संघात समता आणण्यासाठी केलेले प्रयोग उदा. वर्णातीत लोक संघपीते होण्यासाठी त्यांना उपसंपदा उच्चवर्णीय लोकांच्या अगोदर देणे. तसेच विनयपिठकाचा म्हणजे संघाच्या घटनेचा अधिकारी पूर्वाश्रमीचा न्हावी उपाली ह्याला ठेवणे. हा केवळ

पारमार्थिक नव्हे तर मानसिक पातळीवर देखील समता आणण्याचा मोठा प्रयोग होता. Tत्यामुळे बुद्धाची समता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रमाण मानली. मा. फु. आ. मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ते क्रांतिकारी बुद्धाचे धम्मदायक झाल्याचे मानण्यात आले. व त्याद्वारे समतेची शक्यता वर्तविण्यात आली. म्हणून मा. फु.आ. आजही गरजेचा वाटतो. मात्र सौत्रांतिकवाद मार्क्सवाद हा नव्या काळाचा मार्गदर्शक तत्वविचार आहे. हे देखील मान्य करावं लागेलं. ह्यात त्यांनी दिग्नागीय तत्वज्ञानाचा मार्क्सवादी तत्वज्ञानाशी संयोग केला आहे. आणि विधायक नाकारीकरणातून सौत्रांतिक मार्क्सवादी तत्वज्ञानाची निर्मिती केली आहे. दिग्नागाचे 'स्वलक्षण' मार्क्सवादाच्या एकप्रवाहवादाचे निकारण करते. त्यामुळे जातीचे स्वतंत्रपणे संशोधन केले पाहिजे, अशी मागणी सौत्रांतिक मार्क्सवाद करतो. भारताची आजची क्रांती नवसाम्राज्यशाही विरोधी जात्यंतक भांडवलशाही क्रांतीची आहे. तिचे आर्थिक स्वरूप मुख्यतः वरचढ शेतकरी जातींच्या उच्चभ्रुंच्या मालकीची असलेली सिलिंगवरची २ कोटी १० लक्ष हेक्टर शेत जमीन भूमिहीन व अल्पभूधारक दलित, आदिवासी व ओबीसींना वाटायची आहे यात आहे. ह्यासाठी दंडनीय जाती व्यवस्था अंताच्या कायद्याद्वारे शेतजमिन ह्या शेतजमिनीच्या मालकांकडून (व देशाचे शास्ते) घ्यावी लागेल. परंतु हे आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे प्रबोधनाशिवाय शक्य नाही. असही शरद पाटील मांडतात. या क्रांतीच्या द्वैती स्वरूपामुळे ती 'स्वलक्षण' आहे. त्यामुळे ती यशस्वी करण्यासाठी तिचे नेतृत्व सौत्रांतिकमार्क्सवादाला करावे लागेल. असं मत शरद पाटील मांडतात.(६) हे तत्वज्ञान नवे जाणीव नेणीव तर्कशास्त्र(जाणेत) निर्मिते. आणि त्याच बरोबर नव्या व्यावहारिक तत्वज्ञानाचा व सौंदर्य शास्त्राचा विकास करायची जबाबदारी नव्या क्रांतिकारकांवर देते.

आचार्य दिग्नागाने आपला क्षणीकवाद (क्षणभंग वाद), ज्यावेळी कोणतीही गोष्ट घडून येते. त्याचवेळी ती अस्तित्वशून्य असते. असा गतीवादी मूलगामी सिद्धांत मांडला. आणि शाश्वतवादाचे अत्यंत अमोघ तर्कव्युहाने प्रभावी खंडन

केले. असे कॉ. मधु शेटये मांडतात.(१) इथे दुसरया बाजूचाही विचार करावा लागेल.

### दिग्नाग व धर्मकीर्ती हे सौत्रांतिकविज्ञानवादी की केवळ सौत्रांतिकवादी

दिग्नाग व धर्मकीर्ती हे सौत्रांतिक विज्ञानवादी होते. हे शेरबाटस्की, देवीप्रसाद चटोपाद्याय इत्यादींचे आकलन शरद पाटलांनी मान्य केले आहे. परंतु प्रदीप गोखलेंच्या मते धर्मकीर्ती हा चैतन्यवादी नसावा. तर बह्यार्थवादी असावा. दिग्नाग व धर्मकीर्ती यांनी स्वलक्षण परमार्थसत मानले आहे. प्रत्याक्षाचा विषय असलेले ‘स्वलक्षण’ हे प्रत्यक्ष ज्ञान न झाले तरी अस्तित्वात असते. व ते प्रत्यक्ष ज्ञानावर परिणाम करते. अशा अर्थाचे त्याचे वर्णन धर्मकीर्तीने न्यायबिंदूत केले आहे. ‘आलंबन परीक्षा’ या ग्रंथातील युक्तिवादाच्या आधारे डॉ. अमरासिंगांनी असे दाखवले आहे की. दिग्नागाने बाह्य परमाणु हे इंद्रिय विज्ञानाला म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानाला कारणीभूत होतात हे नाकारलेले नाही. चक्षुन्द्रीय हे प्रत्यक्ष ज्ञानाला कारणीभूत असते. पण प्रत्यक्ष ज्ञान हे काही चक्षुन्द्रीयाचा आकार धारण करू शकत नाही. (तर विषयाचा आकार धारण करते. ) आणि म्हणून चक्षुन्द्रीय प्रत्यक्ष ज्ञानाचा विषय होत नाही. त्याच प्रमाणे परमानुचा आकार धारण करीत नाही. तेव्हा दिग्नागाने आलंबन परीक्षेतही बह्यार्थ नाकारला. नसेल तर त्या ग्रंथाच्या आधारे दिग्नागाला विज्ञानवादी कसे ठरविता येयील हा प्रश्न डॉ. अमरसिंग करतात. यापुढे जाऊन प्रा. प्रदीप गोखले मांडतात की, सौत्रांतिक विज्ञानवादी आणि तांत्रिक माद्यमिक अशा संप्रदायाचा सरमिसळ स्वरुपात जर अभिनव गुप्तावर प्रभाव होता असे मानले तर त्यासाठी दिग्नाग व धर्मकीर्तीचे तत्वज्ञान मुळातच सौत्रांतिक व वैज्ञानिक असे दुहेरी स्वरूपाचे होते असे मानण्याची गरज राहत नाही. (८) अर्थात नंतर ह्याबद्दल फारशी चर्चा झालेली दिसत नाही. शिवाय सौत्रान्तिक मार्क्सवादाचा प्रतिवाद केल्याचे डॉ. प्रदीप गोखालेंकडून दिसत नाही. त्यामुळे आजही सौत्रांतिक मार्क्सवादाची मांडणी

विचाराधीन होण्याची प्रक्रिया चालू झाली आहे असे दिसते. अर्थात यावर अभ्यासकांमध्ये अध्यापि गंभीर चर्चा होण्याची गरज आहे.

**स्त्रियांचं स्त्रीसत्ता ते स्त्रीदास्यात झालेलं अवमूल्यन**

कॉ. शरद पाटलांचे अत्यंत महत्वाचं योगदान म्हणून स्त्रीवादाच्या भूमिकेकडे पहाव लागेल. जात वर्ग या शोषणाच्या संस्थेबाबत त्यांनी लिंगभेद लिंगभावाची पद्धतीने दाखल घेतली. त्यासाठी स्त्रीदास्य हा नवा शब्द प्रयोग त्यांनी का वापरला हे मुळातूनच समजून घेण्याची गरज आहे.

कॉ.शरद पाटील दाखला देतात कि, जे जी. फ्रेजर यांच्या संशोधनातून सिद्ध झाले आहे की, राजपद हे मूलतः कृषिमायेच्या गरजेतून उदभवलेले असून त्याची लष्करी आणि राजकीय गरज गौण होती. मानव व निसर्ग यांना सुपीक करणारी सर्व सामाजिक शक्ती स्वतःत सामावल्यामुळे वा स्वतःच्या नियंत्रणाखाली आणल्यामुळेच राजा त्या पदाचा अधिकारी होतो. दुसरा दाखला देतात की, 'द मदर्स' रोबर्ट ब्रीफोल्ट या फ्रेंच पंडिताने, मोर्गन एंजल्सच्या प्रतीपादानाप्रमाणे आद्य समाज साम्यवादी गणसमाज नसून तो स्त्रीसत्ताक गणसमाज होता.

काही मंडळी स्त्रीसत्तेला इतिहास न मांनता मिथ समजतात. परंतु कॉ. पाटील आपल्या 'साम्यवाद मातृशासित स्त्री सत्ता आणि आधुनिक समाजवाद' ह्या त्यांच्या चौथ्या खंडातील प्राथमिक साम्यवाद मातृशासन आणि स्त्रीसत्ता ह्या प्रकरणात जगातील स्त्रीसत्तेचे अनेक दाखले देतात. प्राथमिक गणसमाज हा स्त्रीसत्तेचा भाग होता. नंतर कुल आणि ज्ञातीयांची समिती पुरुषांनी स्थापन केली. भारताप्रमाणेच चीन मध्येही मातृशासित व्यवस्था मोसुओइस्ट होती. चीन मधील मोसुओइस्ट यांना ते मातृशासित असल्यामुळे सर्वोच्च स्थान आहे. त्यांची लोकसंख्या ३० हजार असून ते युनान आणि सिचुयान या प्रांताच्या सीमेवर राहतात. इंडोनेशिया मध्ये पश्चिम सुमात्रा प्रदेशात आजही 'मीयोंगबॉस' या प्रदेशात मातृसत्ताक समाज आहे. अरबामध्ये दक्षिण अरबस्थानातील

कृषिप्रदेशात अभिजात स्त्रीसत्ता नांदत होती. महंमदी धर्मापुर्वी तेथील स्त्रियांना नवरा निवडण्याचे स्वतंत्र्य होते. तर येमेन हे स्त्रीसत्ताक होते. अशी अनेक उदाहारण कॉ.शरद पाटील देतात. (१) स्त्रीसत्तेच्या अस्तित्वाची पुष्टी डॉ. अशोक राणा आपल्या ‘मातृपूजन विश्वभजन’ यालेखात देतात. जगातील सर्वात प्रगत प्राचीन संकृतीमध्ये मेसोपोतामियाच्या संस्कृतीचा पहिला क्रमांक लागतो.(आशिया खंडातील इराकमध्ये त्याचा समावेश होत होता.)

युफेटीस व टायग्रीस या दोन नद्यांमधील प्रदेश या अर्थाचा मेसोपोटामिया हा शब्द ग्रीकांनी त्यासाठी वापरला. या प्रदेशात झालेल्या उत्खननात इ.स. पूर्व ५०००चि म्हणजे सर्वात प्राचीन संस्कृती असून तेथील लोकांनी सर्वात प्राचीन शेती केल्याच्या खुणा आढळल्या आहेत. दक्षिण मेसोपोटामियातील इरुतू इथे प्रगत संस्कृती नांदत होती. मातृदेवता ‘इनन्ना’ मेसोपोटामियाच्या संकृतीमधील आद्य मातृदेवता म्हणून समजली जाते. लैंगिक प्रेम, सुफलीकरण या मानवी जीवनाच्या महत्वाच्या अंगाशी सबंधित ही देवता होती. अर्थात ‘इनान्ना’ हि त्या शेतीची निर्माती असल्या खेरीज तिला तत्कालीन समाजाने मातृदेवता पद बहाल केले नाही. (९) मेघालयात समाजव्यवस्था मातृशासित असून स्त्री पुरुषांपेक्षा संपन्न असते, हे सर्वश्रुत आहेच. केरळ राज्य मातृसत्ताक असल्याच आजही मानल जात. कॉ. शरद पाटील निॠत्तीचे विवरण त्याचमुळे करू शकले. हरित हा प्राचीन धर्मसुत्रकार मातृशासित व्यवस्थेचा अपत्य होता. त्याच्यानुसार वैदिकी आणि तांत्रिकी अशा दोन वेगळ्या श्रुती आहेत. तांत्रिक श्रुती ही मातृसत्तेची होय. पुढे पितृशासित चातुवर्णव्यवस्थेतून मातृसत्तेचे विकृतीकरण करण्यात आले. भारतीय इतिहासात म्हणूनच तांत्रिक श्रुती नेणीवेत गेली. आणि पितृशासित वैदिक श्रुती जाणीवेत दृढ झाली. ह्या दोन्ही श्रुती भारतीय समाजात विरोधाचे सहअस्तित्व म्हणून राहिल्या. दिग्नाग स्कूलची तांत्रिक परंपरा निॠत्तीच्या तांत्रिक परंपरेशी कॉम्रेड जोडतात. इतिहास पुरातत्वीय आधारावर असतो हे मान्य. पण म्हणून इतिहासाचे मौलिक विश्लेषण प्राप्त असलेल्या साहित्यावर

असेल तर नव्या आव्हानासाठीची त्याची उपयुक्तता प्रामुख्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. कॉ. शरद पाटीलांनी साहित्याच्या आधारावर जे मंडळ आहे. त्याची अहमियता आजही समजून घेतली पाहिजे. आर्यांचा उपनयन संस्कार ब्राह्मण आर्यांशिवाय होऊ शकत नव्हता. तर अनार्यांचा उपनयन म्हणजे गण पुष्करणीत अभिसिंचन होणे आणि अनार्यांच्या कोणत्याही धार्मिक विधीत ब्राह्मणास स्थान नव्हते. पुष्कर हे हिंदूंचे एक पवित्र तीर्थ आहे. आणि राजस्थानातील अजमेरजवळ आहे. या पुष्कराजवळ उर्वशीची राजधानी होती. हे कॉम्रेड शरद पाटील दाखवतात. (१०)

निऋत्तीचे संशोधन भारतीय परंपरेशी सबंधित असल्याचे दिसते. अर्थात निऋत्तीच्या अस्तित्वाचा पुरातत्वीय आधार देखील काही मंडळीनी दिलेला आहे. डॉ. रा ची. ढेरे यांनी महाराष्ट्रातील काही घराण्यामध्येही सहादेवी नावाच्या एका कुलदेवीची उपासना होत असल्याचा उल्लेख केलेला आहे. ती जेष्ठ अलक्ष्मीशी समरूप असल्याच ते मांडतात. दुःसहाची पत्नी या नात्याने तिला सहादेवी म्हटलं असाव असा तर्क ते मांडतात. शरद पाटील ‘दास शुद्रांची गुलामगिरी’ या ग्रंथात ‘भूमाता’ या प्रकारानामध्ये निऋत्ती ही आर्यपूर्व देवता होती, हे नमूद करून जैन धर्मामध्य तीचं स्थान अतिशय महत्वाचं आहे असं मांडतात. सिंधू संस्कृतीच्या एका मुद्रेवर यज्ञाचा देखावा दाखवलेला आहे. डोक्यावर त्रीशुंगी मुकुट असलेली एक महानग्नी देवता पिंपळाच्या झाडात उभी असून पक्षाचे मुखवटे घातलेले पुरोहित तिची पूजा करीत आहेत. औषधी सुक्त म्हणते कि, पिंपळाचे झाड हे वनस्पतीचे घर आहे. १.१४.७. या ऋचेवरून दिसते की, निऋत्ती वंशज वरुणाचाही मंगलवृक्ष पिंपळ होता. डॉ. ढेरे यांनी कर्नाटकातील बदामी या प्राचीन क्षेत्रातील सहादेवीची मूर्ती पिंपळाच्या पारावर ठेवलेली असल्याच म्हटलं आहे. ती सहादेवी अर्थात जेष्ठा म्हणजेच निऋत्ती आहे. हे कॉ. पाटील यांच्या वरील विधानावरून स्पष्ट होते. प्रा. नीरज साळुंखे दैत्य बळी व कुंतल देश महाराष्ट्र (२००२) या शोधग्रंथात निऋत्ती या शब्दाचे मूळ आर्ष भाषेत असून आजच्या

कन्नड मध्ये तो आढळतो. असं महत्वाचं निरीक्षण मांडतात. डॉ. ह. धी. सांकलिया यांनी समालोचन या पुस्तकात (पृ. ४७) राक्षसांचा राजा म्हणून निऋत्तीचा उल्लेख केलेला आहे. (एखादी कर्तबगारी स्त्री कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करू लागली की ती पुरुषी झाली असे म्हणतात.) आंध्रप्रदेशातील नालगौंडापासून उत्तर पूर्वेला पानुमाल येथे पच्चल सोमेश्वराच्या देवळात त्याची मूर्ती आढळते. अशी माहिती त्यांनी दिली आहे. सोंखच्या उत्खननात निऋत्तीचची मूर्ती मिळाली आहे. असंही ते मांडतात. पुरातत्व अवशेषाच्या रुपात निऋत्ती अजुंनही आपल्या अस्तित्वाच्या खुणा दाखउन आपल्या प्रजेला आवाहन करीत आहेत. असा विस्मृत दाखला डॉ. अशोक राणा देतात.(११) निऋत्तीचे पुरातत्वीय अस्तित्व अत्यंत गुंतागुंतीच करून तिच्या सर्व खुणा गुणांसह नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने केलेला आहे. तिला राक्षस, राक्षसीण अथवा मृत्यू देवता अशा उपाद्या लाऊन बदनाम करण्याचा भाग हा त्यातीलच आहे.

**स्त्री पुरुष मुक्त संबंध तत्कालीन कारण**

सुफलीकरनासाठी मुक्त स्त्री- पुरुष संबंध हा तात्कालिन परिस्थीचा भाग होता. तंत्र साधनेत मद्य, मांस, मैथुन, मस्य व मुद्रा या पाच 'म' काराला महत्व होत. पुढे त्याचा अतिरेक झाल्यावर संतांनी त्याच्या विरोधात आघाडी उभारली. शेती भरभरून येण्या करिता तंत्र साधना कमी अधिक प्रमाणात चालूच राहिल्या. पिकांच्या समृद्धीसाठी स्त्री पुरुष सबंध शेतात जमिनीवर करण्याची प्रथा युक्रेन सारख्या देशात आहे. स्त्री पुरुषांच्या सामुदाईक मैथुन विधीला महत्व असतं. वैश्विक काम भावनांशी सहभाग साधण्यासाठी मानवी काम साधनेची आवश्यकता असते अशी श्रद्धा होती. ब्रिटीश उत्तर बोर्नियात स्त्री आणि पुरुष यांचा विधियुक्त समागम सामुहिकरित्या चालतो. व पुन्हा सामाजिक नैतिक बंधन कडकपणे पाळावी लागतात. ह्या उदाहरणावरून जमिनीच्या

सुफलीकरनाकरिता करावयाचा विधी जगभर कमी अधिक प्रमाणात सारखेच आहेत हे दिसून येते.

स्त्री व भूमी यातील साधर्म्य हे दोन्हीही निर्मिती केंद्रच आहेत. स्त्री मानवाला जन्म देते. तर भूमी वनस्पतीला जन्म देते. विश्वाला जन्म देणाऱ्या आधीमानवाचीच ही दोन्ही रूपे आहेत. शेतकऱ्यांची निऋत्ती भूमाता व तिची आराधना शेतकरी दगड धोंड्यांच्या रुपात करत आलेला आहे. शतप्रथ ब्राह्मणात जलकुंभात दगड ठेऊन तो नैऋत्य दिशेस फेकण्याचा विधीचा उल्लेख आहे. ती सुफलतेची शेतीची देवता होती. हे यातून सूचित होतं. असं डॉ. राणा मांडतात. (१२) कॉ. शरद पाटील स्त्री सत्ता व निऋत्ती याच अर्थाने इतिहास बोधाद्वारे स्त्रीचे निर्मिती श्रेय मुक्त स्त्री सबंध या मुल्य प्रेरणांना मार्गदर्शनीय मानत असावेत. असे दिसते. पण इथे काळाची मर्यादा आहे. तेव्हाची त्या गणसमाजाची ती गरज होती. आज ती तशीच मानून तिला परंपरा समजून घेणे सामाजाविकासाच्या दृष्टीने योग्य की अयोग्य ह्यांची मीमांसा होणे गरजेचे आहे. त्याची जबाबदारी नव्या अभ्यासकांवर काळाने टाकलेली आहे. स्त्रीदास्यान्तक नेणीव घडविण्याचं काम कॉ. शरद पाटलांनी मांडलेल्या इतिहास बोधनातून होऊ शकेल.

मानव गणाचे स्त्रिया व पुरुष हे जसे दोन गाणार्य होते. तसे विश्वाचे पृथ्वी व आकाश ही दोन विश्वार्थ होते. स्त्रीने शेतीचा शोध लावला. शेतीसाठी पावसाची आवश्यकता व त्यातून ध्यावा व पृथिवी यांच्या देवविवाची गरज गणमानवाने पहिली होती. ह्या गरजेतूनच मानवी गणधर्मांनी आपल्या प्रातिनिधिक व सामुहिक देव विवाहांची कृषीमाया अथर्व वेदातील विवाह सुक्तांनी रचली. त्यामुळे स्त्रियांच्या गणधर्माला क्षत्र वर्ण व पुरुषांच्या ब्रम्ह वर्ण म्हटले गेले. वरखड उत्पादनपूर्व स्त्रीसत्ताक समाजातील लिंगभेद हे वर्णभेद होते. वर्णाचा मूलतः उगम असा झालेला आहे.(वर्गापेक्षा पूर्णतः वेगळा) स्त्री सत्ताक गणसमाजाची लैंगिक विषमता ही आर्थिक शोषणावर अधिष्टीत नव्हती. कारण हा समाज

अजून वरकड उत्पादन श्रम बनू शकलेला नव्हता. हा समाज जो अन्नोपार्जन करी त्याचे समान वाटप मत करत असत. म्हणून या समाजात आर्थिक समता होती. (१३) स्त्री सत्तेत लैंगिक विषमता ही स्त्रीने केलेल्या नैसर्गिक समतेच्या अंकित होती. त्या आद्यगणसमाजात कोणताही शत्रुभाव नव्हता. कारण वरकड उत्पादनाच्या अभावी तो येणेच शक्य नव्हता.

मात्र स्त्री सत्तेतील समता ही आजच्या काळात किती उपयुक्तदायी होईल ही शंका येणे साहजिकच आहे. वास्तविक स्त्री सत्तेतील समता ही नैसर्गिक व स्वाभाविक होती. अन्नोपार्जानाचे समान वाटप हा देखील त्याचा भाग होता. त्यामुळे ती प्राथमिक स्तरावरची समता होती. स्त्री क्षेत्र व पुरुष ब्राह्मण हे दोन वर्ण असल्याने त्यांच्यात असलेला सबंध गणांच्या सहवासाने तयार झालेला होता. कॉ. शरद पाटलांच्या मते निऋत्तीचा स्त्रीसत्ताक गणसमाज हा स्वतंत्र, समता व बंधुत्व आणि लोकशाहीचा उदगाता आहे. त्यामुळे साहजिकच बुद्धाची ही आधुनीक काळाला उपयुक्त म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली ही तत्वे यांना गौण ठरवले जाईल ही शंका निर्माण होणे साहजिकच आहे. बुद्धाची स्वातंत्र्य, समता बंधुभाव आणि लोकशाही ही पूर्णतः वर्ण शोषानातील समाजात समता आणण्यासाठी वापरत आणलेली तत्वे आहेत. म्हणूनच बुद्धाची समता स्वातंत्र्य बंधुत्व ही तत्वे आधुनिक काळाला उपयुक्त समजून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी (फ्रेंच क्रांतीची ही तत्वे नाकारून) स्वीकारली आहेत.

राम व कृष्णाने केलेल्या स्त्री सत्तेच्या उच्चाटनातून व स्त्रियांना स्त्री दास्यात ढकलण्यात आलेल्या स्थितीचा उलगडा कॉ.शरद पाटील करतात. लोकशाही म्हणजे समतेसाठीचा संघर्ष समतेचे साक्षात साधन चीनच्या (भारताच्या तांत्रिक ) परंपरेत स्त्रियांचे प्राधान्य समतेची हमी मानली जात असे. पण स्त्रीराज्येतर समाजात स्त्रिया सर्वात शोषित व पिडीत बनल्या म्हणून लोकशाहीची कसोटी लैंगिक समानतेसाठीचा संघर्ष हीच आहे. असं शरद पाटील आग्रहाने मांडतात. (१४) अर्थात यावरून स्पष्ट होते की, लैंगिक समानतेच्या

इतिहास बोधाद्वारे शरद पाटील स्त्री सत्ताक राज्यातच लोकशाहीचा परिपोष होत असल्याचा मानत असावेत. स्त्री सत्ताक राज्यातच लोकशाहीच्या गणसमिती आणि गणसभा पद्धतीची निर्मिती झाली. गणसमिती ही केवळ महिलांची सत्ता चालवायची. पण गणसमितीमध्ये स्त्री व पुरुष दोन्ही असायचे. (१) बुद्धाने मात्र संघाची रचना करतानाच समतेची चौकड करून ठेवली होती. त्यामुळे ती संघ बाह्य समाजाच्या अंतरंगावर परिणाम करणार होती. अर्थात त्यातूनच समतेची पायाभरणी विषमता ओतपोत भरलेल्या तत्कालीन समाजातच बुद्ध करू शकला. बुद्धकालीन समाज अगोदर असलेल्या समाजाच्या तुलनेत जास्त उत्पादक असला तरी तो वर्णजातीय शोषक शासक व शोषित शासित समाजाच्या पायावर उभा होता. पण आद्य स्त्रीसत्ता कोणत्याही शोषणावर उभी नव्हती. शिवाय स्त्रीसमतेचा आजच्या काळातील कालातीतपणा लक्षात घ्यावा लागेल. त्यासाठी जेनिटीकल (गुंणसुत्रांचा ) समतेचे गुण स्त्री सत्तेद्वारे समाजात आले आहेत का? याचा जैविक व मानसशास्त्रीय दृष्ट्या विचार करावा लागेल. भारतीय स्त्रियांची पुरुषांधीनता सर्वसामान्यपणे सर्व जातीगतात दिसून येते. डाव्या चळवळी अजुन शहरात व मध्यम वर्गीय स्त्रियांपुरती सीमित आहे. तर दलित चळवळीत डॉ. आंबेडकरांनंतर स्त्रियांचा सहभाग जास्त प्रमाणात राहिलेला दिसत नाही. त्यामुळे भारताची लोकशाही क्रांती अपूरी राहिलेली आहे. त्यांना प्रेरणा देण्याच काम आद्य स्त्री समतेची स्वतंत्र समता आणि बंधुभाव ही तत्वे देऊ शकतील. तर पुरुष व स्त्रियांच्या समन्वयक समतेचा इमला बांधण्याच काम बुद्धाची समता करू शकेल. म्हणून स्त्री सत्तेची समता आणि बुद्धाची समता यांच्या अनोन्य सबंधनातूनच नव्या समतेची वाट शोधावी लागेल.

## स्त्री सत्ता ते स्त्री दास्य आणि रामाचे विश्लेषण

असं काही मंडळी मांडतात की, कॉ. शरद पाटलांनी रामायण महाभारतातील घटनांना ऐतिहासिक समजून मांडणी केली. व त्याला आक्षेप देखील घेतला जातो. वास्तविक केवळ शरद पाटलांनीच या द्वयीबद्दल लिहिलं असं नाही. डॉ.

भदंत  आनंद कौशल्यायन यांनी देखील रामायणावर भाष्य आपल्या 'रामकहाणी, राम कि जबानी' या पुस्तकात केल आहे. आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते लिहितात, "महात्मा गांधीने वाल्मिकीके श्रीराम और व्यास के श्रीकृष्ण को ऐतिहासिक पुरुष नाही माना. आज श्रीराम के भारतीय जनमानस प्रभाव कि साक्षी उनकी रामलीला है. और 'श्रीकृष्ण के प्रभाव कि साक्षी उनकी 'जन्माष्टमी.' राम व कृष्ण ऐतिहासिक आणि अनैतिहासिक ही बाब मुळात चर्चा करणे योग्य वाटत नाही. रामायण महाभारतातील वर्ण संघर्ष हा वर्ग संघर्ष ठरू शकत नाही. जो भारतीय इतिहासाचा मार्क्सवादी आकलनाच्या विरोधात जाणारा हा मुद्दा होता. त्यामुळे भारतिय इतिहास मिमांसेच्या शरद पाटलांच्या कॅटेगरीज मार्क्सवादी कॅटेगरीपेक्षा पुष्कळच वेगळ्या आणि विपुल आहेत. अशी टिपणी प्रदीप गोखले करतात. (१५) शरद पाटलांनी ह्या संघर्षाची परिणीती स्त्री दास्यात झाल्याचे सिद्ध केलेलं दिसतं हे महत्वाचे आहे.

रामाचे ऐतिहासिक महत्व अमान्य केले तरी रामायण हे भारतीय इतिहासाचे एक साधन असल्याचे अमान्य करता येत नाही. म्हणून राम या इतिहासाच्या साधनाचे ऐतिहासिक विश्लेषण करावेच लागेल. असा खुलासा शरद पाटील करतात.(१६)

रामायण हे स्त्री सत्ता विरुद्ध पुरुष सत्ता यांच्या निर्णायक संघर्षाचे महाकाव्य आहे. रामाचा स्त्री सत्तेविरोधी पहिला संघर्ष गंगा व शरयू यांच्या संगमावरच्या दक्षिण तीरावरील मलद कुरुशांची राणी ताटका हिच्याशी झाला. स्त्री सत्तेच्या पराभवासाठी पुरुष सत्तेला १०,००० राक्षसांची कत्तल करावी लागली. स्त्रीचे शेतीचे समीकरण स्त्री सत्तेत झालेले होते. तीच शेत वा क्षेत्र करीत होती. म्हणून क्षत्र होती. वारसा स्त्री क्षेत्राजाला मिळायचा की, पुरुष क्षेत्राजाला या मुलभूत प्रश्नावर धुमश्चक्री होणे अपरिहार्य होते. कौसल्या ही कोसल(उत्तर प्रदेश) गणांच्या राजपदाची कायदेशीर वारस होती. दशरथाने कौशल्यामार्फतच (तिच्याशी विवाह करून)राजपद मिळवले. पण कौशल्याच्या

पुत्राकडे ते गेल्यास ते मातृवंशातच राहणार होते. ते पुर्ण पुरुष वंशक करण्यासाठी दशरथाने केकयांच्या (जिल्हा जालंधर पंजाब) कैकायीशी लग्न केले. केकयाच्या राजाने कैकयी राजशुल्क शर्थीवर म्हणजे कैकयीच्या मुलालाच कोसलचे राज्य मिळेल या शर्तीवर दशरथाला दिली. असे राम वनवासात भारताला सांगतो. मातृवंशक वारसाचे उन्मूलन करण्यासाठी अशा प्रकारे कौसल्येविरुद्ध कैकयीचा उपयोग केला गेला.

पुढे स्त्री सत्ताक गणसमाजाच्या जागी वरकड उत्पादन शोषणावर जो पुरुष सत्ताक गणसमाज आला. तो दासप्रथाक त्र्येवर्ण्य समाज होता.(वर्णाचा क्रम क्षत्रिय, ब्राह्मण व दास असा होता.) मात्र तरीही या समाजात भार्या दास व पुत्र हे अधन होते. तसेच पुढील काळात (इ. स. पूर्व १७५०) आर्यांच्या आगमनानंतर त्या समाजात वर्णाचा क्रम ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असा होता. पण कारण द्रोपदीला कायदा सांगतो त्यानुसार दास, पुत्र जात्याच अस्वतंत्र स्त्री हे तिन्हीही अधन होते. अशा प्रकारे सबंध स्त्री जातीचे दास शुद्र वर्णाशी समीकरण केले गेले. दासांना वेद दोन पायांची जनावरे द्विपद म्हणतात. अशाप्रकारे एकाबाजूला तिचे निर्जीव शेताशी समीकरण करून वारस हक्काबाबत तिच्या क्षेत्रजयापासून तिचे परत्मिकरण केले गेले. तर दुसरया बाजूला तिचे द्विपद पशुशी समीकरण करून मालमत्ता व स्वतंत्र्य यापासून तिचे परात्मिकरण केले आहे. म्हणजे स्त्रीला दास्यात ढकलले गेले. असे विश्लेषण शरद पाटील करतात.(१३)

युरोपीय सामंत समाजाच्या तुलनेत भारतीय जातीप्रथा समाज बंद समाज होता. बंद जाती समाजाचे प्रवेशद्वार बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे स्त्री असल्याने तिच्या मुक्तीचा प्रश्न जात्यान्ताशी जोडला गेला पाहिजे. परंतु केवळ आद्य गणसमाजातील स्त्री स्वातंत्र्याचा विचार पुरेसा होऊ शकत नाही. त्यासाठी बुद्धाच्या थेरीगाथेचा व भिक्षुनींनी वर्णिलेल्या स्वातंत्र्याचा तसेच त्यांनी केलेल्या समाज परिवर्तनाच्या वैचारिक तसेच व्यावहारिक योगदानाचा विचार करावा लागेल.

## ब्राह्मणी अब्राह्मणी संकल्पना जातीय की समाजशास्त्रीय कॅटेगरी

मा.फु. आ. चा पुरस्कार केल्यानंतर ब्राह्मणी अब्राह्मणी हा सिद्धांत मांडला. अर्थातच या सिद्धांताला नारायण सुर्वे, बाबुराव बागुल ते डॉ. रावसाहेब कसबे यांनी विरोध केला. कॉम्रेड शरद पाटील वारंवार आपल्या लेखनातून ब्राह्मणी अब्राह्मणी सिद्धांताची मांडणी सातत्याने करीत आलेले आहेत. वैदिक श्रुतीने तांत्रिक श्रुतीला अब्राह्मणी म्हणून धिक्कारले. त्यामुळे भारतीय इतिहासात ब्राह्मणी जाणीव व अब्राह्मणी नेणीव ह्या विरोधाचे सहअस्तित्व राहिलेले आहे. भारतीय विचार दर्शनातील पारंपारिक संघर्ष हा पश्चिमी परंपरेप्रमाणे अध्यात्मवाद विरुद्ध भौतिकवाद असा नसून तो ब्राह्मणीवाद विरुद्ध अब्राह्मणीवाद असे असल्याचे पुरेसे स्पष्ट झालेले आहे. असं मत डॉ. यशवंत सुमंत मांडतात. भारतातील एकूण तत्वविचारच या दोन पारंपारिक छावण्यांमधील आंतरक्रियेमुळे उदयास आलेले दिसते. किंबहुना मार्क्सवाद भारतात आल्यानंतरही या पारंपारिक संघर्षाचा निरास झाला, असे नसून, भारतातील मार्क्सवादी छावनीलाही या पारंपारिक संघर्षाने ग्रासले आहे. हे विसरून चालणार नाही. या पारंपारिक संघर्षाचे भान न ठेवता केली जाणारी भारतीय इतिहास व सामाजिक चिकित्सा अपुरी तोकडी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. असाही इशारा प्रा. यशवंत सुमंत देतात. (१७) मात्र भारतीय विचार परंपरेतील ब्राह्मणी व  अब्राह्मणी या पारंपारिक संघर्षाचे भान ठेऊन शरद पाटील येथील जातिव्यवस्थेचा वेध घेत होते. भारतीय तत्वज्ञानाचे तर परंपरेने ब्राह्मणी तत्वज्ञान व अब्राह्मणी तत्वज्ञान असे विभाजन केले आहे, हे राधाकृष्णन यांच्या ‘इंडियन फिलोसोफी’ वरून दिसेल. सामाजिक संघर्षाच्या पदार्थापासून ही तत्वज्ञाने तोडल्यामुळे ती निष्प्राण होतात. आणि मग त्यांचे केवळ अकेडेमिक विवेचन शक्य होते. याउलट परंपरेने केलेले त्यांचे ब्राह्मणी व अब्राह्मणी विभाजन सामाजिक संघर्षाच्या आधारावरच केलेले आहे. त्याचे विवेचन शरद पाटलांनी ‘धर्मकीर्ती व आमचा काळ’ या लेखात केलेले आहे.

जात्यांतता  व स्त्री मुक्ती विचार भारतीय परंपरेत सांख्य, लोकायत, बौद्ध, कौल, शैव तर आधुनिक काळात फुले, पेरियार आणि आंबेडकर यांच्या अब्राह्मणी प्रवाहातच झालेला आहे. ही कोणालाही नाकारता न येण्यासारखी वस्तुथिती आहे. जात वर्ग ह्या दोन्ही व्यवस्थेचा अंत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ काढला. ब्राह्मणशाही व भांडवलशाही हे दोनच शत्रू आहेत असे मांडले. हा जात वर्ग लढ्याचा भारतीय इतिहासातला पहिलाच प्रयत्न होता.

ब्राह्मणी व अब्राह्मणी ही संकल्पना जातीय जर मानली तर अब्राह्मणी शब्दाला पर्यायी शब्द कोणता वापरता येयील? फुले आंबेडकरांनी ब्राह्मणी शब्दाचा वापर ब्राह्मणेतर व दलित आदिवासी यांना जागृत करण्यासाठी केला. भारतीय इतिहासातील ब्राह्मणी ग्रंथाचा उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या तिसऱ्या खंडात केला. उदा. मनुस्मृती, गीता, पुराण इ.

वास्तविक भारतीय समाजाला ब्राह्मणी व अब्राह्मणी या ध्रुव वस्तू नसून अनोन्य सापेक्ष प्रक्रिया आहेत. या परस्पर विरोधी भारतीय गण वा पक्षांच्या एकजुटीला अनित्यवादाच्या परिभाषेत विरोधाची एकजूट म्हणतात. कोणतीही वस्तू वा घटना एकात्म नसते. तिच्यात दोन पक्ष व प्रक्रिया कार्यरत असतात. म्हणूनच कॉ. शरद पाटील उदाहरण देतात की, भारतीय सौंदयशास्त्रात ब्राह्मणी व  अब्राह्मणी या विरोधाची एकजूट एका व्यक्तीत उतरलेली दिसते. अभिनव गुप्ता (११ वे शतक) त्याच्या शैव कौल तत्वज्ञानात चातुवर्ण्य विरोधी व अब्राह्मणी होता, तर सौंदर्यशास्त्रात त्याने भारताच्या सामंत जातीय वा ब्राह्मणी सौंदय शास्त्राचा विकास केला. यावरुन हे सिद्ध होते की, ब्राह्मण व  अब्राह्मण हे वर्ण जातीवाचक सामाजिक पदार्थ आहेत. तर ब्राह्मणी व  अब्राह्मणी हे अमुर्तीकृत साहित्यिक, दार्शनिक व सांस्कृतिक पदार्थ आहेत.(१८)

भारतीय दार्शनिक व सांकृतिक संघर्षाचा सबंध कॉ. शरद पाटलांनी सौंदर्य शास्त्रीय संघर्षाची जोडला आहे. त्यांनी  मांडलेल्या अब्राह्मणी सौंदर्य शास्त्राचे योगदान अत्यंत मोलाचे ठरत आहे. पण तरीही त्यांच्या सौंदर्यशास्त्राची मांडणी साहित्यापलीकडे गेली नाही. हे खरे असले तरी ती इतर कला शाखेमध्ये जाण्यासाठी नव्या अभ्यासाकांवर फार मोठी जबादारी येते. त्यांनी वापरलेले ब्राह्मणी व  अब्राह्मणी शब्द केवळ वस्तूचे यथार्थ वर्णन करण्यासाठी आहेत. आणि यथार्थ वर्णनाशिवाय आकलन व वस्तूचे स्वरूप समजत नाही. आणि जोपर्यंत ती वस्तू तिच्या स्वरूप व गुणधर्माशिवाय समजली जात नाही तोपर्यंत तिला बदलता येण शक्य नाही. ब्राह्मणी या शब्दाला जर स्वीकारलं जात तर अब्राह्मणी हा शब्द जातीवाचक कसा होऊ शकेल? एम.एम.पाडीयान आपल्या 'ब्राह्मीण एन्ड नॉन ब्राह्मीण' ह्या पुस्तकात स्पष्टपणे मांडतात की, मागील शतकात तामीळ समाज हा ब्राह्मणी व  अब्राह्मणी या दोन पक्षांनी व्यापलेला होता. आणि ह्या दोन कॅटेगरीचा प्रभाव तामीळ राजकीय पक्ष व मुख्य अकेडेमिक प्रवाहात देखील दिसून येत होता. तेव्हा अब्राह्मणीला पर्यायी शब्द दिल्यास श्युड़ो पुरोगामी सुधारकांना अवकाश मिळतो. व तो सामाजिक संघर्षाऐवजी सामाजिक सहमती नव्हे समरसतेची भाषा करू लागतो. त्यामुळेच सामाजिक पदार्थ हे सामाजिक संघर्षाचे द्योतक असतात. पण संघर्षाचे सामाजिक क्रांतीत रुपांतर तत्वज्ञानाचे पदार्थ करू शकतात. तत्वज्ञानाचे पदार्थ जर तटस्थ वा खच्ची केलेले तृतीय पुरुषी असतील तर समाज क्रांतीची सुतराम शक्यता नाही. असं स्पष्टपणे शरद पाटील बजावतात.(१९)

प्रा. शर्मिला घोष व प्रा. श्रीज्ञान हलधर यांनी भारतीय समाज साहित्यातील मुलभूत संघर्ष हा वर्ग संघर्ष नसून ब्राह्मणी व  अब्राह्मणी आहे हे ते आपल्या 'भारतीय सौंदर्यशास्त्राबाबत भूमिका अब्राह्मणी दृष्टीकोनाची समस्या' या लेखात मांडतात. ते विस्ताराने लिहितात की, ऐतिहासिक भक्तीचे दोन आयाम आहेत. १)गीता व इतर ब्राह्मणी साहित्याद्वारे वरून भक्ती २) जातीय जुलूम व

सामाजिक अन्यायाविरुद्ध खालून भक्ती. तिचे बहुतेक पुरस्कर्ते मुसलमान कबिरासह, ब्राह्मणेत्तर होते. हे उपदेशक सामान्यजन होते. कबीर हा विनाकार होता. नामदेव शिंपी होता. ज्ञानेश्वर सन्यास सोडलेल्याचा मुलगा व तुकाराम शेतकरी होता. चैतन्य स्वतः ब्राह्मण असला तरी त्याने जातीभेद जोरदारपणे नाकारला. आणि मुसलमान, हरिदास व शुद्र शेतकरी यांना शिष्य म्हणून स्वीकारले. ते सर्व स्थानिक बोलीभाषेत उपदेश करीत असत. त्यांनीच स्थानिक बोलीभाषेत समृद्ध साहित्य निर्माण केले. जयदेवाचे गीतगोविंद, कृष्णदास काविराजाचे चैतन्य चरितामृत व कबीराचे दोहे या अप्रतिम कलाकृती आहेत.(२०) अब्राह्मणी साहित्यात सौंदर्य शास्त्राची शरद पाटलांची निर्मिती ह्या सर्व ज्ञात अज्ञात कलाकृतींना समाविष्ट करतो. जगात कुठेही सर्वहारांचे सौदर्य शास्त्र नाही. नवं समाज निर्मितीसाठी तत्वज्ञान व प्रमाणशास्त्राइतकीच सौंदर्यशास्त्राचीही निकड आहे. असे कॉ.शरद पाटलांचे आग्रही प्रतिपादन आहे.

भारताच्या ज्ञानशाखा ब्राह्मणी व अब्राह्मणी अनोन्य संबंधांतून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे या व्यामिश्र परंपरेला त्याज्य मानणे व अब्राह्मणी म्हणूण जातीय ठरवीत राहणे नवं समाज निर्मितीला अडथळा होऊन बसेल. मार्क्सवाद हे केवळ जाणीवेचे शास्त्र असल्याने ते अद्‌वैती आकलनात फसले आहे. दिग्नागाने मनाच्या द्‌वैतीचा (जाणीव नेणीव युक्त) प्रमाणशास्त्राचा उपयोग केला आहे. असा दावा शरद पाटील करतात. व त्यातून लेखक, कलावंत जाणीव नेणीव प्रक्रिया उलगडून दाखविणारे नवे समाजवादी सौंदर्यशास्त्र कलावंतांना नव्या समाजवादी समाजाच्या निर्मितीचा आतमविश्वास देईल. एवढे मोठे कार्य सौंदर्य शास्त्रात होऊ शकेल. असंही त्यांनी प्रतिपादित केलं आहे. सौदर्य शास्त्राची निकड आजची उपयुक्तता, नव्या समाजाच्या निर्मितीत सौंदर्य शास्त्राचा कसा वापर करावा. ह्या प्रश्नावर चर्चा व्हायला हवी.

## आंबेडकरवाद आणि कॉम्रेड शरद पाटलांची दृष्टी -

आज कॉ. शरद पाटलांच्या मृत्युनंतर आंबेडककरवाद विरुद्ध कॉ. शरद पाटील अशी काही मंडळी चर्चा करताना दिसतात. पण मुळातच कॉ. शरद पाटलांना काय मांडायचे होते. त्यातून त्यांनी आंबेडकरवादाशी केलेला वैचारिक संघर्ष (तसा त्यांनी मार्क्स, बुद्ध, फुले यांच्याशीही केला आहे.) व त्यावर केलेली टीका ह्याचा व्यवस्थित अभ्यास होणे गरजेचे आहे. कॉ. शरद पाटील सौत्रांतिक वादाच्या मांडणीपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तत्वज्ञानी मांडत होते. पण नंतर त्यांनी लेनिन, माओ, फुले, आंबेडकर, ग्राम्सी या सर्वांना तत्वज्ञानी मानण्याच नाकारलं.

कॉ. शरद पाटील अगदी १९९० पर्यंत डॉ. आंबेडकरांच्या तात्विक योगदानाची दाखल व त्या मांडणीचा उपयोग करत आलेले दिसतात. मात्र त्यानंतर त्यांनी केलेली डॉ. आंबेडकरांवरील टीका अवस्तुनिष्ट व एकांगी पद्धतीने दिसते. उदा. भारतीय राज्य घटनेने जाती अंताचा प्रोग्रॅम दिलेला नाही. असं सय्यद शहाबुद्दीन यांच्या 'मेनस्ट्रीम' मधील लेखाचा आधार घेऊन मांडलेलं मत तसेच डॉ. आंबेडकरांनी मांडलेला बुद्ध जॉन ड्युई प्रणीत बुद्ध झाला होता. वगैरे. या ठिकाणी बऱ्याच मुद्द्यांचा विचार करणे योग्य नाही. म्हणून लेखाच्या विस्तारभयामुळे खालील तीन बाबींची चर्चा (इतर चर्चा टाळत) आवर्जून करावीशी वाटते.

१) बुद्धाने समाज क्रांती केली पण कोणती समाजक्रांती केली ह्याचा उलगडा बाबासाहेब आंबेडकर करू शकले नाहीत. असं शरद पाटलांचं मत आहे. तथापी डॉ. आंबेडकरांच्या तिसऱ्या खंडात (विशेषतः प्रकरण सहा मध्ये ) बुद्धाच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्रांतीच्या चर्चा आलेली आहे. भारतीय समाजात भौतिक क्रांती इतकीच सांस्कृतिक व धार्मिक क्रांती अनोन्य आहे. किंबहुना भौतिक वा सांकृतिक यात अनोन्य सबंध दिसून आलेला आहे. उदा. उपनयन संस्काराने वर्ण ठरविण्याची क्रिया (वर्ण भौतिक होता.) तत्कालीन समाजात होती. त्यामुळे जरी आंबेडकरांनी स्पष्ट भौतिक क्रांतीचा उल्लेख केला

नसला तरी त्यांनी बुद्धाच्या क्रांतीचा सांस्कृतिक आशय मांडला हयाकडे दुर्लक्ष होणे इतिहास प्रबोधनाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. परंतु कॉ. शरद पाटलांनी बुद्धाच्या भौतिक क्रांतीच केलेलं विश्लेषण अत्यंत मोलाची भर इतिहास बोधनात टाकून गेला आहे. हे लक्षात घ्यावं लागेल.

२) बुद्धाला कॉ. शरद पाटील एका बाजूने दास प्रथाक वर्ण अंताची क्रांती केल्याचं श्रेय देतात. तर दुसरया बाजूने जाती सरंजामी व्यवस्थेच्या निर्मितीच अपश्रेय नकळतपणे देतात. असं म्हटलं जात. कोम्रेडांना काय मांडायचं आहे, त्यातील आशयघन व परिणाम काय असू शकतात. हे अधिक सखोल जाऊन चर्चा करावयास हवी. डॉ. हबीब इरफान यांच्या जातीव्यवस्था ही बुद्धकाळात तयार झाली. व तिला त्याने (बुद्धाने) अहिंसा व कर्म यांचे टेकू दिले. या मांडणीस शरद पाटील उत्तर देतात. बुद्धाने धम्म व संघाची उभारणी करताना वर्ण प्रथाक संघगण समाजाचा अंत अटळ असून सामंत प्रथाक जाती समाजाचा उदय अनिवार्य आहे. हे जाणल होते. बुद्ध कालीन वज्जी संघगण हा पाशवी दासप्रथेवर उभा असल्याचे बुद्ध स्वजनाच्या (शक्यांच्या ) व इतर गणांच्या निरीक्षणावरून जाणत होता. तसेच गणांच्या शवावर जन्माला आलेल्या कोसल, मगध, वत्स व अवंती या नव्या अगणी राजसत्ता, अल्पोत्पादक दास श्रमाऐवजी अत्युत्पादक निम स्वतंत्र शुद्र श्रमाच्या समर्थक असल्याचेही तो जाणत होता. म्हणून बुद्ध व त्याचा संघ वर्ण व्यवस्थाक दास प्रथेचा अंत करनाऱ्या पंच धम्माचा उपदेश बहुजनांना करीत फिरत होता. बुद्ध ज्या वर्णव्यवस्थाक दास प्रथेचा अंत करू इच्छित होता तिचा गणसमाज द्विजांच्या लोकशाही, स्वतंत्र व समतेवर उभा होता. तर ज्या निम स्वातंत्र शुद्र प्रथाक सामंत समाजाचा उदय तो सुकर करू पाहत होता तो लोकशाही व समता यांच्या अभावावर उभा होता. हा विरोध सोडवणे बुद्धाच्या हाती नव्हते. कारण तो अनिवार्य समाजविकासाचा क्रम होता. नवोदित समाजाची जातीव्यवस्था ही या अनिवार्य समाजविकासाची पाया होती. बुद्धापुढे चोईस नव्हता !

म्हणून बुद्धाने आपल्या अनुयायी गृहस्थ उपासक उपसिकांना भिक्षूभिक्षुनी प्रमाणेच दिक्षेची अट घातली नव्हती. कारण त्याला माहित होते की, उपासक उपासिका दीक्षित होऊनही जाती व्यवस्थेत जगणार व तिने ती ग्रस्त राहणार.(२१) पुढे जाऊन शरद पाटील मांडतात की, कोणत्याही समाज क्रांतीकारकाला तडजोडीशिवाय समाज क्रांती करता येत नाही. इथे कॉम्रेड बुद्धाला केवळ जाती संस्था निर्मितीच अपश्रेय देतात असे नसून तर त्याची सामाजाक्रांतीतील तडजोडही दाखवत आहेत.

समाजविकास हा स्वतःच्या नियमांनी होत असतो. या शरद पाटलांच्या मताचा प्रतिवाद प्रा. प्रदीप गोखले करतात की, समाज क्रांतीत मानवतावादाचा काही वाटा असतो की नाही ? आधीची गुलामगिरी प्रथा जाऊन नवीन जात प्रथा आणि जी आधीच्या व्यवस्थेच्या तुलनेत अधिक उदार आणि अधिक उत्पादनक्षम, हीच बुद्धाची क्रांती होय. परंतू प्रा. गोखले पुढे जाऊन विश्लेषण करतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही मांडणी करता आली नसती. कारण जातीप्रथा आणि अस्पृश्यता या बाबी गुलामगिरी किंबहुना त्याहूनही जास्त वाईट आहेत. असे त्यांचे मत होते. (२२) बुद्धाने स्त्रियांना (भिक्षुणींना) आठ अटी दिल्या त्यावरून बुद्धाला शरद पाटील पुरुषसत्ताक विचारांचा मानत होते. परंतु भारतीय नारीचे बौद्ध धर्माने जे अभूतपूर्व उन्नयन केले ते आजच्या क्रांतीकारी पक्षांना अजूनही साध्य झाले नाही. आणि या उन्नयाचा पाया होता स्त्रीची अध्यात्मिक मुक्ती.(ज्याचं वर्णन थेरी गाथेत भिक्षुनिंनी केलेलं आहे. व त्याचे श्रेय बुद्ध व आनंदला जाते.) कारण भौतिक मुक्तीचा काळ अजून यावयाचा होता.(२२)अशी ही विधायक मीमांसा कॉम्रेड बुद्धाच्या धम्माची करतात. अशा पद्धतीने डॉ. आंबेडकरांनी तिसऱ्या खंडात (डॉ. आंबेडकर रायटिंग एन्ड स्पिचेस खंड ३) स्त्रियांची उन्नती बौद्ध धर्माने केली. ह्याचा आढावा घेतला आहे.

३) डॉ. आंबेडकरांच्या राज्यघटनेत जात्यांताचा कोणताही उपाय सुचविलेला नाही. असे सय्यद शहाबुद्दीन यांच्या ‘मेनस्ट्रीम’ मधील लेखाचा आधार घेऊन शरद

पाटील प्रतीपादतात की, आरक्षणाने जाती व्यवस्थेचे चिरस्थायीकरण केले. ही कॉ. पाटलांची एक बाजू तर भारतात ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकर प्रणित 'समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताकाची' घटना येऊन दलित हे अस्पृश्य न राहता अनु. जाती झाले. (म्हणजे अस्पृश्य अनु. जाती होणे हा देखील समाजातील बदलाचा म्हणजे कदाचित जात्यांताचा निम्न स्तरावरील प्रकार असेल, तो झाला हे मान्य केल्याचं दिसत) त्याप्रमाणे नेपाळमध्ये झाले नाही. असं नेपाळमधील झालेल्या राजकीय उलथापालथीवर कॉम्रेड तुलनात्मक भाष्य करतात.(२४) तेव्हा कोम्रेडांनी मांडलेले मुद्दे व त्याची परामर्शता अत्यंत समजुतदारपणे करावी लागेल. कारण ते स्वतः तत्वज्ञ असल्याने त्यांच्या विचारांचं आकलन करीत असताना अनेक तर्कांचा त्यातील विसंगतीचा, सुसंगतीचा तसेच नव्या विचारांचा प्रसंगी त्यातील वरील उल्लेखलेल्या दुलगतेचा निपेक्षपणे आकलन करून घ्यावं लागेल. त्यांच्या विचारांतील सहिष्णुता आणि आणि आत्यंतिकपणा यांच्याशी वैचारिक संघर्ष करीत विधायक नाकारणे पुढे जावे लागेल. शिवाय त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनपर कार्यक्रमपत्रिकेच विवेचन करून नव्या काळाची समृद्ध अशी बुद्ध, मार्क्स. फुले. आंबेडकरांची कॉम्रेडांनी जपलेली वैचारिक परंपरा येत्या काळात जोरकसपणे पुढे आणावी लागेल.

जगदिप मोरे

मु. पो. मिळन्द ता. राजापूर जि. रत्नागिरी

**संदर्भ**

१) भारतीय समाजवादी लोकशाहीचा स्वतंत्र मार्ग असू शकेल का? - मधु शेटये यांचा लेख - सत्यशोधक एल्गार जुलै २०११ (पान क्र. १५ ते ३० )

२) असेंब्ली निवडणुकींच्या निकालापासुनही धडे घेतले नाही - कॉ. शरद पाटील यांचा लेख - सत्यशोधक एल्गार जुलै २०११

३) मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद - शरद पाटील -पान क्र. १५

४) 'सत्याशोधक एल्गार' ने मला केलेल्या साक्षेपी व  जबाबदार  चिकित्सेच्या आवाहनाला उत्तर - कॉ. शरद पाटील -सत्यशोधक एल्गार- डीसेंबर २०११

५) आंबेडकरवाद व कॉ. शरद पाटील - डॉ. प्रदीप गोखले यांचा लेख - सत्यशोधक एल्गार फेब्रुवारी २०११ (पान क्र. ११ ते १४)

६) असेंब्ली निवडणुकींच्या निकालापासुनही धडे घेतले नाही - कॉ. शरद पाटील यांचा लेख - सत्यशोधक एल्गार जुलै २०११ (पान क्र. १२)

७) भारतीय समाजवादी लोकशाहीचा स्वतंत्र मार्ग असू शकेल का? - मधु शेटये यांचा लेख - सत्यशोधक एल्गार जुलै २०११

८) भारतातील दार्शनिक संघर्षाचा शरद पाटीलकृत अन्वयार्थ - प्रा. प्रदीप गोखले यांचा लेख - समाज प्रबोधन पत्रिका- जुलै ते सप्टेंबर २००३

९) डॉ. अशोक राणा यांचा लेख (पान क्र.४२) - चित्रलेखा १० मे २०१०

१०) भारतीय इतिहासाच्या संघर्ष - लेखक कॉ. शरद पाटील - सत्यशोधक मार्क्सवादी फेब्रुवारी २००१ (पान क्र. ३६ )

११) 'मातृपूजन विश्वपूजन' डॉ. अशोक राणा यांचा लेख धारावाही १०. भाग क्र. ८ चित्रलेखा १० मे २०१०

१२) 'असत्याची सलकथा - भूमातेची आराधना' पान क्र. ३७ ते ४० डॉ. अशोक राणा यांचा लेख चित्रलेखा १८-७-२००५

१३) 'स्त्रियांचा प्रश्न' कॉ. शरद पाटील यांचा लेख - सत्यशोधक मार्क्सवादी ऑक्टोंबर नोव्हेंबर १९८६ (पान क्र.५ ते २५ )

१४) नव्या तत्वज्ञानाशिवाय चीन समाजवादी बांधणी करेल?- शरद पाटील यांचा लेख - समाज प्रबोधन पत्रिका जुलै २००३

१५) 'रामायण महाभारतातील वर्ण संघर्ष' प्रा. प्रदीप गोखले यांचे भाषण - सत्यशोधक मार्क्सवादी ऑगस्ट १९८८

१६) 'संघर्ष रामकृष्ण भक्ती व आंबेडकर भक्तीचा' लेखक शरद पाटील - सत्यशोधक मार्क्सवादी फेब्रुवारी १९८८

१७) 'महाराष्ट्रातील जातीसंस्थेचा विचार' प्रा. यशवंत सुमंत यांचा लेख - सत्यशोधक मार्क्सवादी -मे-जून १९८८

१८) संपादकीय लेख पान क्र. २२, सत्यशोधक मार्क्सवादी- नोव्हेंबर, डिसेंबर १९८८

१९) अब्राहमणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र वरील समग्र वादळ - शरद पाटलांचा लेख - सत्यशोधक मार्क्सवादी - सप्टेंबर-ऑक्टोबर १९८८

२०) भारतीय सौंदर्यशास्त्राबाबतची भूमिका ' अब्राहमणी दृष्टीकोनाची समस्या' प्रा. शर्मिला घोष, श्रीज्ञान हलधर यांचा लेख - सत्यशोधक मार्क्सवादी - जाने.- फेब्रुवारी १९८९

२१) मा. फु. आ. पान क्र. १५५

२२) भारतातील दार्शनिक संघर्षाचा शरद पाटीलकृत अन्वयार्थ - प्रा. प्रदीप गोखले यांचा लेख - समाज प्रबोधन पत्रिका- जुलै ते सप्टेंबर २००३

२३) 'भिक्खू आनंद' - शरद पाटील यांचा लेख - सत्यशोधक मार्क्सवादी १९८३

२४) मावोवाद्यांची कसोटी आज नेपाळात, उद्या भारतात ! कॉ. शरद पाटील यांचा लेख. परिवर्तनाचा वाटसरू - १५ नोव्हेंबर २००६

**इंग्रजी संदर्भ**

१) Primitive communism, matriarchy, Gynocracy & modern socialism – com. Sharad patil (page no. 10 to 17)

२) Dr. Babasaheb Ambedakar writing & speeches vol. – 3

३) Brahmin & Nonbrahmin

## जोतिबाची लेकरं....

एकनाथ ढोकळे

जोतिबाची लेकरं आम्ही जोतिबाची लेकरं
समतेसाठी लढतो आम्ही जोतिबाची लेकरं।।

अहो शिकारीला जाईहो ....
कंदमुळ पाला खाईहो ....
अन् आला वाघ सिंह आलाहो ....
त्यानं माणुस बघा नेलाहो ....
अन् टोळीसाठी मरत होती जोतिबाची लेकरं।

तिनं जन्म पुन्हा दिलाहो ....
काय आनंद त्यो झालाहो ....
शेतं फुलविलं तिनं हो ....
अन्न पिकविलं तिनं हो ....
(अन् म्हणुन(
मान तिला देऊ लागे जोतिबाची लेकरं।

कसं इपरित झालं हो ....
पशु शेतामंदी आलं हो ....
पुरुष मालक त्याचा झालं हो ....
नव पिकं मोठ आलं हो ....
(अन् मग(
वारसाचा प्रश्न करी जोतिबाची लेकरं।

माझं पोर माझं घरं हो ....
पुरुष सत्ताशिलेदारं हो ....
त्यानं काढलं हो हत्यारं हो ....
तिला केलं हो बेजारं हो ....

अन् जुलमी पुरुषसत्ता बघा जोतिबाची लेकरं।

आला धर्म सांगे बाई हो ....
तिनं बोलु नाही काही हो ....
(अन् बोलण्याचा प्रयत्न केलाच तर...)
नाकं कान छाट्लं जाई (शुर्पनखा) हो ....
डांवावर लावलं जाई (द्रोपदी) हो ....
अन् जुलमी धर्मसत्ता बघा जोतिबाची लेकरं।

मार्क्सहो .... आंबेडकरं-फुले-
त्यांनी दिला हो इचारं हो ....
जातवर्ग पित्रुसत्तेवरं हो ....
त्यांनी केला हो प्रहार हो ....
(अन् म्हणून(
क्रांतीचं सप्न पाही जोतिबाची लेकरं
मुक्तीचं सप्न पाही जोतिबाची लेकरं ।

## कॉ. शरद पाटील यांचा जीवन संघर्ष

1925- 17 सप्टेंबरला धुळे येथे सत्यशोधकी कुटुंबात जन्म. 1942, धुळे येथेच मॅट्रिक्युलेशन- 1943, बडोद्याच्या कलाभवनात पेंटिंग कोर्सला प्रवेश. 1944- मुंबईत सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल. 1945- युद्धोत्तर पहिल्या देशव्यापी विद्यार्थी संपात सहभाग. 1946- शिक्षण सोडून जीवनदायी कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षाच्या मुख्यालयात चित्रकार, 1947- धुळे येथे ट्रेड युनियन आघाडीवर. 1949- हद्दपारी, 1951- शेतकरी आघाडीवर 1956- पासून आजतागायत आदिवासी चळवळीत कार्यरत. 1964- कम्युनिस्ट पक्ष दुभंगल्यानंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात दाखल. 1966 दोनदा तुरुंगवास भोगून सुटल्यानंतर बडोद्यात संशोधनासाठी व संस्कृत (पाणिनी) व्याकरण शिकण्यासाठी वास्तव्य. 1971- 72 Dasa-Shudra Slavery ग्रंथ लिहिला. 1978 (27 जुलै) जातिव्यवस्थैविरुद्ध लढायला माकपने नकार दिल्याने माकपचा राजीनामा. 1978 (15 ऑक्टोबर) मार्क्सवाद- फुले- आंबेडकरवादी तत्त्वावर आधारलेला सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष स्थापन. 1982 (ते 1993) पक्ष मुखपत्र सत्यशोधक मार्क्सवादीचे संपादक. 1987 दलित- आदिवासी- ग्रामीण संयुक्त महासभेतर्फे साक्री येथे संमेलन. 1994- 95 जातिव्यवस्थापक सामंती सेवकत्व, खंड 2 चे लिखाण

### ग्रंथसंपदा- चार प्रमुख खंड

खंड 1 भाग 1 व 2 दास- शुद्रांची गुलामगिरी (इंग्रजी व मराठी), खंड 1 भाग 3 रामायण- महाभारतातील वर्णसंघर्ष- शंबुक, एकलव्य, सीता, कर्ण, द्रौपदी, विधुर, कृष्ण, खंड 2- भाग 1 जातिव्यवस्थापक सामंती सेवकत्व (इंग्रजी व मराठी), खंड 2 भाग 2 शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण महंमदी की ब्राह्मणी? खंड 3 जात्यंतक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती (इंग्रजी व मराठी), खंड 4- प्रिमिटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता- स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवादी (इंग्रजी व मराठी), Caste Feudal Servitude खंड 2 **काही महत्त्वाची पुस्तके** अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, मार्क्सवाद- फुले-

आंबेडकरवाद, भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत, बुद्ध- भारतीय इतिहासातील लोकशाही, स्वातंत्र्य व समतेचा अग्निस्त्रोत, पश्चिम भारतीय स्वायत्त आदिवासी राज्याची भूमिका, स्त्री शुद्रांच्या स्वराज्याचा राजा (नाट्यसंहिता), शोध, मूलनिवासींचा की शूद्र वर्णाचा की जात्यंतक समतेचा? नामांतर- औरंगाबाद आणि पुण्याचे बुद्ध, भिक्खू आनंद, धम्म, आनंद, वधू विशाखा. **'सत्यशोधक मार्क्सवादी' चे मुख्य संपादक.**

**कॉ. शरद पाटील संशोधन व प्रबोधन केंद्र**

**<u>केंद्रीय समिती</u>**

अध्यक्ष: प्रा. कॉ. रणजीत परदेशी

उपाध्यक्ष: प्रा. सचिन गरुड

सेक्रेटरी: एकनाथ ढोकळे

सहसेक्रेटरी: शैलेंद्र तांबे

खजिनदार: जगदीप मोरे

सल्लागार: सागर तायडे

**सदस्य:**

सरोज कांबळे, प्रभाकर गायकवाड, रमेश बिजेकर, धम्मानंद सोनकांबळे, जितेश पगारे, सुदीप कांबळे, विलास कांबळे, सुदाम चिंचाणे, विशाल साळवे.